# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक: 09.04.2026** **वार: गुरूवार**

1. खरीप हंगामाकरिता स्फुरद आणि पोटॅश खतांवरच्या अनुदानासाठी 41 हजार 533 कोटी रुपयांची तरतूद
2. रिझर्व बँकेद्वारे रेपो रेट आहे तसाच ठेवण्याचा निर्णय
3. अमेरिका आणि इराण यांच्यातल्या युद्धविरामाचं भारताकडून स्वागत आणि
4. सांगली, इथं अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धेत अमृतसरच्या गुरु नानक देव विद्यापीठाला विजेतेपद

**केंद्रीयमंत्री मंडळ निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळाने काल 2026 च्या खरीप हंगामासाठी स्फुरद आणि पोटॅश खतांसाठी पोषक तत्त्वांवर आधारित अनुदान दरांना मंजुरी दिली. त्यासाठी 41 हजार 533 कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागणार असल्याचं, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. जागतिक बाजारपेठेतल्या किमतींच्या चढ-उताराचा फटका शेतकऱ्यांना बसू नये, यासाठी हा निर्णय घेतला असल्याचं सांगताना ते म्हणाले.....

**सबसे पहला खरीफ सीजन के लिए न्यूट्रिएंट बसे सब्सिडी स्कीम में फोर्टी ओने थाउजेंड फाइव हंड्रेड थर्टी फॉर क्रोर रुपीस का सब्सिडी का पैक अगर हम कोविद के समय से अब तक का एक्सपीरियंस देखे तो फर्टिलाइजर के प्राइस किसी भी कारण से दुनिया में अगर ऊँचे हुए हो लेकिन उसको उसका प्रभाव भारत में नहीं पड़े ऐसी। माननीय प्रधानमंत्री जी ने की है। आज का फैसला भी उसी संकल्प का है जो डीएपी बहुत इम्पोर्टेंट फर्टिलाइजर है। इसका 50 kg का बैग एकदम फिक्स ₹1,350 पर लगातार चलाया गया है। इसके लिए सब्सिडी बढती जा रही है लेकिन किसानों पे कोई बोझ न आए ये ध्यान में रखकर फैसले लिए गए हैं।**

**रिझर्व्ह बँक**

रिझर्व बँकेनं रेपोदरात कोणताही बदल नं करण्याचा निर्णय घेतला असून तो पूर्वीइतकाच म्हणजे 5.5 टक्के राहणार आहे. 2026 या आर्थिक वर्षात ,आर्थिक वृद्धी दर 7 पूर्णांक 6 दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून 2027 या वर्षात तो 6 पूर्णांक 8 दशांश राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. रिझर्व बँकेच्या पतधोरण समितीच्या 2026-27 या आर्थिक वर्षातील पहिल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी काल माहिती दिली.

चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाई दर 4 पूर्णांक 6 दशांश टक्के असेल, असाही रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. जागतिक बाजारातल्या कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे, महागाई वाढण्याची शक्यता मल्होत्रा यांनी व्यक्त केली. पुरवठा साखळी भक्कम करण्यासाठी आणि व्यवसाय सुलभतेकरिता रिजर्व बँकेनं अनेक पावलं उचलल्याचं ते म्हणाले. नजीकच्या काळात अन्नधान्याच्या किमतींबाबतची स्थिती समाधानकारक राहील, असंही त्यांनी सांगितलं. भारतीय अर्थव्यवस्था भक्कम असून पूर्वीपेक्षा परिस्थिती अधिक चांगली असल्याचंही त्यांनी नमूद केलं. युद्धाच्या काळात सरकारनं केलेल्या विविध उपाययोजनांमुळं युद्धाचा परिणाम कमी व्हायला मदत झाल्याचंही ते म्हणाले.

**मुद्रा योजना**

प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे तरुणांमध्ये स्वयंरोजगार वाढीस लागल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. तारणमुक्त कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेला काल 11 वर्ष पूर्ण झाली. या योजनेमुळे नवउद्योजकांना योग्य

संधी मिळाल्यानं ते आत्मनिर्भर झाले आणि देशाच्या प्रगतीत योगदान देत असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. या योजनेमुळे देशातल्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग तसंच अनेक व्यक्तिगत उद्योजकांसाठी कर्जव्यवस्थेत आमूलाग्र बदल झाले असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे.

**मुख्यमंत्री**

डेटा सेंटरमधली प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी उपयुक्त ठरणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. मुंबईत इक्विनिक्स कंपनीच्या एमबी-थ्री डेटा सेंटरचे उद्घाटन करताना ते बोलत होते. ऊर्जा शाश्वततेच्या दृष्टीनं यवतमाळ इथं उभारण्यात आलेल्या 26 मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पातून या डेटा सेंटरसाठी आवश्यक ऊर्जेचा मोठा भाग उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**सामंजस्य करार**

शाश्वत नागरी विकास, औद्योगिक आणि पर्यटन वृद्धी, नवीकरणीय ऊर्जा क्षमता आणि इलेक्ट्रिक मोबिलिटी क्षेत्रात व्हिएतनाममधली विन ग्रुप जॉईंट स्टॉक कंपनी महाराष्ट्रात अंदाजे साडेआठ अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. कंपनीने यासंदर्भात काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासोबत सामंजस्य करार केला. यामुळे राज्यात शाश्वत विकास, हरित ऊर्जा, आधुनिक पायाभूत सुविधा आणि गतिशील वाहतूक व्यवस्थेला चालना मिळेल. तसंच, राज्यातील पर्यटनवृद्धीसह मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असल्याचा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

**युद्धविराम**

अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धविरामाचं भारतानं स्वागत केलं आहे. यामुळं पश्चिम आशियामध्ये चिरस्थायी शांतता प्रस्थापित होईल आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांची वाहतूक आणि जागतिक व्यापाराचा मुक्त संचार सुरळीत होईल अशी आशा परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनात व्यक्त केली आहे.
इराणमधील वेगानं बदलणारी परिस्थिती लक्षात घेता, तिथल्या भारतीय दूतावासानं सध्या इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना, दूतावासाच्या समन्वयानं आणि दूतावासाने सुचवलेल्या मार्गांचा वापर करून लवकरात लवकर इराणमधून बाहेर पडण्याचा सल्ला दिला आहे.

**शेअर बाजार**

इराणबरोबरच्या युद्धविरामाच्या घोषणेचा परिणाम काल भारतीय शेअर बाजारात दिसून आला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये 2 हजार 800 पेक्षा जास्त अंकांची वाढ झाली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही 800 पेक्षा जास्त अंकांची वाढ झाली.

**नाशिक**

गेल्या काही वर्षांपासून आर्थिक अडचणींत असलेल्या नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पुनरुज्जीवनासाठी राज्य शासनानं 672 कोटी रुपयांच्या भांडवली मदतीला मंजुरी दिली आहे. रिझर्व्ह बँकेच्या निकषांची पूर्तता करणं आणि बँकेची विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करण्याच्या उद्देशानं शासनानं ही मदत दिली आहे.

**आदिवासी धान-वुईके**

आदिवासी बहुल जिल्ह्यांत धान कापणी सुरू असताना धान उत्पादक शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणांनी अधिक जबाबदारीनं काम करण्याचे निर्देश आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांनी दिले आहेत. तसंच शबरी आदिवासी वित्त आणि विकास महामंडळाच्या योजनांमध्ये महिला बचत गटांना आणि युवकांना विशेष प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या आहेत. धान नुकसानाबाबत मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत ते काल बोलत होते.

**सामाजिक समता सप्ताह**

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या वतीनं 8 ते 14 एप्रिल या कालावधीत 'भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त पुणे विभागातील पुणे, सातारा,सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून सामाजिक समता, महापुरुषांचे विचार आणि शासकीय योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत. पुणे प्रादेशिक कार्यालयात प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून काल या सप्ताहाला सुरुवात झाली.

**समता सप्ताह-सोलापूर**

सोलापुरातही , पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहा'चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचं सामूहिक वाचन करण्यात आलं तसंच विशेष ग्रंथप्रदर्शनाचं उद्घाटन झालं.

**पालघर**

पालघर जिल्ह्यातल्या शाळांमध्ये बोगस पटसंख्येवर बसणाऱ्या विद्यार्थ्यांना आळा घालण्यासाठी शिक्षण विभागानं परवा अकरा तारखेपासून मोठी तपासणी मोहीम हाती घेतली आहे. जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, सर्व शाळांमधील प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या आणि नोंदवहीतील पटसंख्या यांची पडताळणी केली जाणार आहे. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कृत्रिमरीत्या वाढवून दाखवली जात असल्याच्या तक्रारी आल्या आहेत.

**ब्रेल आंतरज्योती साहित्य संमेलन**

पुणे अंधजन मंडळाद्वारे परवा 11 तारखेला पुण्यातील कमला अमूल मसंद तांत्रिक प्रशिक्षण केंद्रात ब्रेल आंतरज्योती साहित्य संमेलनाचं आयोजन केलं आहे. या संमेलनात दिवसभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून साहित्य क्षेत्रातील मान्यवरांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आलं आहे.

**कनोईंग-कयाकींग**

सांगली, इथं पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग अजिंक्यपद स्पर्धेत 19 पदके प्राप्त करीत अमृतसरच्या गुरु नानक देव विद्यापीठानं विजेतेपद मिळवलं. स्पर्धेत चुरशीची लढत देणाऱ्या मोहालीच्या चंदीगड विद्यापीठानं उपविजेतेपद मिळविले आणि चंदीगडच्या पंजाब विद्यापीठाला तिसरा क्रमांक मिळाला. सांगलीच्या रॉयल कृष्णा बोट क्लब इथं काल या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ खासदार विशाल पाटील यांच्या उपस्थितीत झाला.

**हवामान**

मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार ..